**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था मजबूत असणं आवश्यक असल्याचं, राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारमूल्य मिळावं यासाठी पुण्यात कापूस, हळद आणि मका पिकांसाठी ‘हेजिंग डेस्क’ सुरू

- २०२६ च्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा, राज्यात ऊसाचं क्षेत्र आणि उत्पादन वाढणार

**आणि**

- ६१ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्राथमिक फेरीची नामांकनं, तसंच बालकलाकार आणि तांत्रिक विभागातल्या पुरस्कारांची घोषणा

**<><><><><>**

देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी मजबूत MSME अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आंतरराष्ट्रीय MSME दिनाच्या कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. MSME क्षेत्र देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्या म्हणाल्या.

**- होल्ड बाईट - राष्ट्रपती -**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. जगभरात MSME क्षेत्राची महत्त्वाची भूमिका ओळखून संयुक्त राष्ट्रांनी २०१७ मध्ये २७ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय MSME दिन म्हणून घोषित केला. यंदाचा MSME दिवसाचा विषय, शाश्वत विकास आणि नवोन्मेषाचे चालक म्हणून MSME ची भूमिका वाढवणं हा आहे.

**<><><><><>**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारमूल्य मिळावं यासाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, स्मार्टअंतर्गत पुणे इथं कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी 'हेजिंग डेस्क' सुरू केली आहे. टप्प्याटप्प्यानं इतर पिकांसाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शेतकरी भविष्यात त्यांच्या उत्पादनांच्या किंमतीत चढ-उतारामुळे होणारे नुकसान टाळू शकतात. हा उपक्रम कृषी क्षेत्रात विकासाच्या दिशेनं एक महत्वाचं पाऊल असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या प्रकल्पाची माहिती देताना सांगितलं. हेजिंग डेस्क' मध्ये भविष्यात विविध पर्यांयाचा विचार करण्यासाठी तसंच जोखीम व्यवस्थापनासाठी शेतकरी उत्पादक संघटना आणि क्लस्टर आधारित व्यवसाय संघटना यांना सेवा कमॉडिटी कराराबद्दल तज्ञ माहिती देतील. तीन हजारापेक्षा अधिक शेतकऱ्यांना हेजिंग साधनं आणि धोरणांवर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मका, कापूस आणि हळदीसाठी ॲन्युअल कमॉडिटी प्राईस रिस्क असेसमेंट रिपोर्टस तयार करून यामध्ये पिकाची सद्यस्थिती, भविष्यकालीन अंदाज आणि धोरणविषयक उपाय सुचवले जातील.

**<><><><><>**

सन २०२६च्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन १५ टक्क्यानं वाढून साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे ही वाढ होण्याची शक्यता एका पतमानांकन संस्थेच्या अहवालात वर्तवली आहे. जास्त पाऊस पडल्यामुळे ऊस उत्पादक राज्यांमध्ये, विशेषतः महाराष्ट्र आणि कर्नाटकात, उसाचं उत्पादन आणि लागवडीखालचं क्षेत्र वाढणार आहे. पुरवठा वाढल्यामुळे देशांतर्गत पुरवठ्याची चिंता कमी होईल. धोरणात्मक परिस्थिती अनुकूल राहिली तर इथेनॉल उत्पादनही मोठ्या प्रमाणात होईल, असं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

भविष्यातला माणूस घडवण्यासाठी जे आवश्यक आहे, त्यानुसार शैक्षणिक धोरणाचं उद्दिष्ट्य निश्चित करण्याची गरज केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. ते आज नागपुरात मंथनच्या वतीनं आयोजित शिक्षक परिसंवादात बोलत होते. जगात समाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. आपल्याला विश्वगुरू व्हायचं आहे, जगातली तिसरी अर्थव्यवस्था व्हायचं आहे आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करायचा आहे, असं प्रधानमंत्र्यांचं स्वप्न आहे. विश्वगुरू म्हणून मान्यता फक्त आर्थिक आधारावर शक्य नाही. त्यासाठी आपली संस्कृती, परंपरा, मूल्याधिष्ठित जीवन पद्धती याचा देखील विचार करावा लागेल, असं ते म्हणाले.

<><><><><>

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचा आजचा लोणंद इथला मुक्काम संपून आज ती तरडगाव या आपल्या पुढच्या मुक्कामाला पोहोचली. या दीड दिवसांच्या मुक्कामात वारकरी आणि भाविकांनी माउलींच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. तरडगावच्या दिशेने जाताना वाटेत चांदोबाचा लिंब इथे सोहळ्यातलं पहिलं रिंगण पार पडलं. यानंतर सायंकाळी तरडगाव इथे मुक्कामासाठी पालखी दाखल झाली. उद्या सकाळी पालखी निघणार असून तिचा पुढचा मुक्काम फलटण इथे असणार आहे.

<><><><><>

६१ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्राथमिक फेरीची नामांकनं जाहीर झाली आहेत. तसंच तांत्रिक आणि बालकलाकार विभागातल्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. वर्ष २०२३ या वर्षातल्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या अंतिम फेरीसाठी आत्मपॅम्प्लेट, जिप्सी, नाळ २, रौंदळ, तेरवं, जग्गु आणि ज्युलिएट, भेरा, आशा, झिम्मा २, अलीबाबा आणि चाळीशीतले

चोर या दहा चित्रपटांना अंतिम फेरीकरता नामांकनं मिळाली आहेत. उत्कृष्ट बालकलाकार म्हणून कबीर खंदारे आणि त्रिशा ठोसर यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याचबरोबर उत्कृष्ट कला दिग्दर्शन अमेय भालेराव, उत्कृष्ट छाया चित्रण प्रवीण सोनावणे, उत्कृष्ट संकलन अक्षय शिंदे, उत्कृष्ट ध्वनिमुद्रण कुणाल लोळसुरे, उत्कृष्ट ध्वनी संयोजन विकास खंदारे, उत्कृष्ट वेशभूषा मानसी अत्तरदे, उत्कृष्ट रंगभूषा हमीद शेख, तर मनाली भोसले यांना तांत्रिक विभागातील पुरस्कार जाहीर झाले आहेत.

**<><><><><>**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मोठ्या गणेश मूर्तींच्या विसर्जन प्रथा परंपरेनुसार व्हावं, यासाठी पर्यावरणाचा दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असलेले आणि न्यायालयात टिकेल असं धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासंदर्भात घेतलेल्या बैठकीत ते बोलत होते.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं सात दिवसांच्या व्हेरिएबल रेट रिव्हर्स रेपो लिलावाचे निकाल आज जाहीर केले. या लिलावासाठी आरक्षित एक लाख कोटी रुपयांच्या रकमेपैकी ८४ हजार ९शे ७५ कोटी रुपयांची बोली लावली गेली आणि ही संपूर्ण रक्कम रिझर्व्ह बँकेनं स्वीकारली. व्हेरिएबल रेट रिव्हर्स रेपो लिलाव हा बाजारपेठेतली अतिरिक्त रोख काढून घेण्याचा एक मार्ग आहे. बाजारपेठेतल्या व्याजदरांनुसार हे लिलाव घेतले जातात.

**<><><><><>**

हॉकी इंडिया मास्टर्स कप स्पर्धेत महिला गटात ओदिशानं तर पुरुष गटात तामिळनाडू संघानं विजेतेपद पटकावलं आहे. चेन्नई इथं झालेल्या अंतिम

सामन्यात ओदिशानं पंजाबवर १-० अशी मात केली. तर पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात तामिळनाडूनं महाराष्ट्राचा ५-० असा पराभव केला.

<><><><><>

हरयाणातल्या रोहतक इथं झालेल्या १७ वर्षांखालच्या कनिष्ठ गट राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेत सर्व्हिस स्पोर्टस कंट्रोल बोर्डाचे दोन्ही संघ विजेते ठरले आहेत. हरयाणाचा संघ दुसऱ्या तर महाराष्ट्राच्या मुलांचा संघ तिसऱ्या स्थानावर राहिला.

<><><><><>

२०२९ ला होणाऱ्या पोलीस, आपत्ती व्यवस्थापन सेवा आणि अग्निशामक दलांच्या जागतिक क्रीडा स्पर्धेचं यजमानपद भारताला मिळाल्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आनंद व्यक्त केला आहे. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा अशी ही घटना असल्याची प्रतिक्रिया त्यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. भारतातल्या क्रीडा क्षेत्रातल्या पायाभूत सुविधांना जागतिक पातळीवर मान्यता मिळाल्याचं हे द्योतक असल्याचं ते म्हणाले. अहमदाबादमधे ५० हून अधिक क्रीडा प्रकारात ही स्पर्धा होईल.

<><><><><>

गेल्या चोवीस तासांत कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पावसानं हजेरी लावली. विदर्भात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. विदर्भात काही ठिकाणी, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस झाला.येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाची तर तुरळक ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता आहे. कोकण किनाऱ्यावर सोसाट्याचे वारे वाहतील असा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. हवामान विभागानं रायगड, रत्नागिरी, पुणे आणि सातारा या जिल्ह्यांना येत्या

चोवीस तासांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर कोकण किनारपट्टीला उंच लाटांचा इशारा दिला आहे.

**//<><><><><>//**